नियमीत दिवाणी दावा क्र. २५/२०२१
विलास वि. सुधीर व इतर

## निशाणी क्र.२५ कडील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने निशाणी क्र. २२ कडील आदेशाची पुर्तता केली नसल्याने दिनांक २८/११/२०२२ रोजी निशाणी क्र. १ कडे झालेला आदेश रद्द करुन कॉस्टची रक्कम भरण्याची परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी आपले म्हणणे दाखल करुन वादीने निशाणी क्र. २२ कडील आदेशाची पुर्तता न केल्यामुळे निशाणी क्र. १ कडे दिनांक २८/११/२०२२ रोजी दावा पुढे चालविण्याबाबत आदेश करण्यात आला. सदर आदेशानंतर दोन तारखा उलटून गेल्या असल्याने वादीने सदरचा आदेश रद्द करण्यासाठी मा. उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल करणे आवश्यक आहे. या कारणास्तव त्यांनी प्रस्तूतचा अर्ज फेटाळण्याची मागणी केली आहे.

२. वादी आणि प्रतिवादी यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने निशाणी क्र. २२ कडील आदेशानुसार कॉस्टची रक्कम भरुन सदर आदेशाची पुर्तता केली नसल्याने दिनांक २८/११/२०२२ रोजी दावा पुढे चालविण्याचा आदेश पारीत करण्यात आला. सदर आदेश वादीने केलेली मागणी नाकारण्याबद्दल नसून आदेशाची पुर्तता संधी देवून सुध्दा वादीतर्फे केली नसल्याने दावा पुढे चालविण्याबाबतचा आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने वादीला त्यांची बाजू अभिलेखावर मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. तसेच त्यामुळे प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याशिवाय दाव्याचा निकाल गुण-अवगुणावर लागण्यास मदत होईल. करीता मी खालील आदेश पारित करतो -

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रतिवादींना एकत्रीतरित्या रुपये ३००/- कॉस्टच्या स्वरुपात देण्याच्या अटीवर निशाणी क्र. २२ कडील आदेशानुसार कॉस्टची रक्कम भरण्याची परवानगी देण्यात येते.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

(सं. गं. सरोदे)

दिनांक : १६/०१/२०२३ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड